# पर्यावरण बदल आणि कोरोना महामारी

**डॉ. कविता आर. बोरकर**
सहयोगी प्राध्यापक, गृहअर्थशास्त्र विभाग
डॉ. एम.के. उमाठे कॉलेज,
भामटी, रिंग रोड, नागपूर 22.
kavitaborkar52@gmail.com
9730538882

---

कोरोना हा निसर्गाने आपल्याला दिलेला धडा आहे. म्हणूनच आपण सगळे आपल्या जगण्याचा नव्याने विचार करू लागलो आहेत. वन ट्री चॅलेन्ज ही त्यासाठीची नवी सुरूवात आहे. आजचा जागतिक पर्यावरण दिन खूप काही अनुभव आपल्यासोबत घेऊन आला आहे. अवघे जग कोरोनाशी झुंजत असतांना भारतात आपण दोन चक्रीवादळे अनुभवली. आधी उन्हाचा कडकडीत तडाखा आणि नंतर 'अम्फान' आणि 'निसर्ग' या दोन वादळांचा फटका. एकीकडे किनारपट्टीवर हे सोसाट्याचे वारे वाहण्याचे इशारे येत होते. तेव्हा तिकडे रेताड प्रदेशात टोळीधाडीचे संकट आले. हवामान बदलाचा एवढा सारा रूद्रावतार दारूवतच यंदाचा पर्यावरण दिन उगवला आहे.

जगभर पसरलेल्या या कोरोनाच्या साथीमुळे सध्या जून (२०२१) अखेर चार लाखांपेक्षा जास्त लोकांना प्राण गमवावे लागले आहेत. त्याशिवाय लाखो लोक जगभरात कोरोनाग्रस्त झाले आहेत. आजपर्यंत मानवी संस्कृतीच्या इतिहासात अनेक नैसर्गिक किंवा मानवनिर्मित संकटे येऊन गेली. पण कोरोना (कोव्हिड–१९) महामारीचे वैशिष्ट्य काय तर या अदृष्य नव्या शत्रूपासून बचाव करण्यासाठी सर्व देश एकत्र आले आहेत. त्या इशाऱ्याने पृथ्वीवरील एका महासंकटाची प्रकर्षाने जाणीव होत आहे. निसर्ग स्त्रोताच्या ऱ्हासामुळे आणि जीवसृष्टीतील अनेक प्रजातीच्या विनाशामुळे निर्माण झालेले पर्यावरणीय महासंकट व त्यामुळे गती मिळत असलेल्या सहाव्या विनाशाची वस्तुस्थितीची चाहूल लागली आहे.

पृथ्वीवरील निसर्ग आणि पर्यावरण यांच्या ऱ्हासाला व असंतुलनाला मानवाची स्वार्थी कृत्येच कारणीभूत आहेत. त्यामुळे कोरोनाचा प्रहार हा जणू तापलेल्या पृथ्वीने दिलेला इशारा आहे. पृथ्वीवरील जीवसृष्टीच्या सहाव्या विनाशास सुरूवात झाली. ती इतक्या झपाट्याने होत आहे की, गेल्या २०० वर्षात ५० टक्के सजीवांच्या जाती–प्रजाती नष्ट झाल्या आहेत.

पर्यावरणाच्या दुरवस्थेमुळे (जंगलतोड, प्रदूषण, कार्बनडाय ऑक्साईडची वृद्धी, समुद्राचे आम्लीकरण, अणू उत्सर्जन इ.) मानवाला होणाऱ्या रोगांमध्ये विशेषत: असंसर्गजन्य आणि मेटॅबॉलिक रोगांमध्ये गेल्या दोन दशकात खूपच वाढ झाली आहे. तसेच अकाली मृत्यूचे प्रमाणही वाढले आहे. शिवाय भूकबळी, कुपोषण, वरचेवर महामारी आणि संसाधने आणि उत्पादने यासाठी होणारी युद्धे, सामाजिक संघर्ष, आर्थिक अडचणी आदी संकटे मानवावर आली आहेत.

**पर्यावरणीय महासंकट निर्माण होण्याची तीन प्रमुख कारणे–**

१) नैसर्गिक संसाधनांचा अतिवापर आणि उधळपट्टी

२) प्रदूषण

३) लोकसंख्येचा स्फोट

निसर्गाच्या किमयागिरीच्या सूत्रापासून मानवाला खूप काही शिकण्यासारखे आहे. किंबहुना या सूत्रांचा आवलंब जीवनशैलीत आणि वस्तू निर्मितीत केला तर निसर्गात संतुलन राहील.

१) निसर्गातील सर्व व्यवहार सूर्यशक्तीवर चालतात.
२) निसर्ग फक्त गरजेपूरतीच उर्जा वापरतो.
३) निसर्गातील आकार कार्यानुरूप असतात.
४) निसर्ग सर्व घटकांचे पुनश्चक्रीकरण करतो.
५) निसर्ग सहकार्याला बक्षिस देतो.
६) निसर्ग विविधतेची पूंजी वापरतो.
७) निसर्ग स्थानिक कौशल्यांचा वापर करतो.
८) निसर्ग अंतर्गत विपूलतेला आवरतो.
९) निसर्ग मर्यादेतील क्षमता वापरते.
१०) निसर्गातील जीवनसृष्टीच्या पुनर्निर्मितीत भोवतालशी समन्वय साधण्याची प्रक्रिया आहे.

कोरोनामुळे काही प्रमाणात पर्यावरणबदल सकारात्मक बदल दिसू लागल्याने काही पर्यावरणवाद्यांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. पण परिणाम तात्पुरता असून तो दीर्घकाल टिकवायचा असेल तर धोरणात्मक बदल आवश्यक ठरले आहेत. या धोरणात्मक बदलांसाठी आग्रही राहतानांच प्रत्येकाने वैयक्तिक पातळीवरही काही गोष्टी करायला हव्यात.

महात्मा गांधीजींनी १०० वर्षापूर्वीच इशारा दिला होता. 'औद्योगिकीकरण निसर्गाला शाप आहे'. त्याचप्रमाणे मानवी संस्कृतीलाही तो शाप आहे. तंत्रज्ञानापेक्षा मूलभूत विज्ञान आणि निसर्गाची उत्क्रांतीची सूत्रे यांचे ज्ञान आत्मसात करण्याकरिता निसर्गाने मानवाला दिलेली बुद्धी, विवके आणि करूणा याचा उपयोग व्हायला पाहिजे. बुद्धीमत्तेपेक्षा सुज्ञपणा महत्वाचा आहे. भौतिक ज्ञान व प्रगतीबरोबरच आध्यात्मिक उन्नती झाली तरच मानव निसर्गावर अन्याय, अत्याचार करणार नाही.

कोरोना संचारबंदीमध्ये कारख्यान्यापासून होणारे प्रदूषण थांबले होते. त्यामुळे हवा, पाणी, स्वच्छ झाले. यावरून प्रदूषणामध्ये औद्योगिकीकरणाचा किती वाटा आहे ते कळते. खाणी, कारखान्यासाठी जंगलतोड झाली आहे. त्यांना त्यापेक्षा दुप्पट जंगल लावून वाढविण्याची सक्ती केली पाहिजे. यापुढे जंगलतोडीस पूर्णपणे बंदी करावी लागेल.

प्रदूषणाची मोजमाप मानके हवीत. तसेच प्रदूषणावर कर व निराकरण न केल्यास दंड हवा. प्रदूषण करणाऱ्या घटकांचे प्रमाण कमी करणे. प्रदूषित पाण्याचे शक्यतो जैविक पद्धतीने शुद्धीकरण अशुद्ध किंवा शुद्ध केलेले पाणीसुद्धा नदी, नाले, तळी यामध्ये जाऊ नये, यासाठी कडक नियम व कायदे करावेत. वाहतूक व्यवस्था देखील योग्य रितीने योजना आखून करायला हवी. जेणेकरून यामुळे प्रदूषण होणार नाही. सायकल वापराला उत्तेजनासाठी सार्वजनिक व्यवस्था, थांबे व मार्ग उपलब्ध करावेत. महामार्ग करण्याचे बजेट, जंगलवृद्धीसाठी रस्ते, नद्या, नाले यांच्या काठाची जागा वृक्षलागवडीसाठी वापरावे.

निसर्गस्नेही इमारतींना उत्तेजन व त्यासाठीच कमी व्याजाने कर्जपूरवठा करावा. आवश्यक तितकेच बांधकाम क्षेत्रफळ बंधन, वृक्षलागवड, अंतर्गत बाग, पर्जन्य जल संकलन व वापरलेल्या पाण्याचे शुद्धीकरण आवश्यक केले पाहिजे. वातावरणकुलर (ए.सी.) वापरावर बंधन आणले पाहिजे. घरातील व्यक्तीच्या

प्रमाणात उर्जा व पाणीवाटप इको–फ्रेंडली सोयीबद्दल घरपट्टीत सूट, शहरात तर सर्वांनाच हे नियम लावावेत.

ग्रामस्थांच्या अन्नधान्य, फळे आणि भाज्यांच्या गरज भागवणाऱ्या शेतीला प्रोत्साहन, इतर दैनंदिन गरजांसाठी ग्रामस्थांना आणि स्थानिक कारागिरांना कामाची संधी उपलब्ध करणे. तसेच बचत गट, मनरेगाला प्रोत्साहन देणे, गावाच्या परिसरात अधिक वृक्षलागवड व चाऱ्यासाठी गायराने करावीत. पाणी, उर्जा व सार्वजनिक उत्पादनाचे समन्यायी वाटप. अशा विविध कल्पना अंमलात आणाव्यात.

शेतीला प्रोत्साहन द्यावे. शक्य तेथे सामुदायिक शेतीचा प्रसार करावा. शेतमजुरांना मनरेगामधुन रोजगार उपलब्ध करून द्यवेत. शेतीसाठी सुलभ अर्थपूरवठा व्हावा. एखादय प्रकल्पासाठी जंगल जमीन दिली असेल तर त्या जमिनीच्या क्षेत्रफळाएवढे जंगल दाखविण्याची तरतूद असावी. अशा तऱ्हेने भारतातील जंगले आणि इको–सेन्सिटिव्ह झोन संरक्षित राहतील. जलसंवर्धन करणे आवश्यक आहे. औद्योगिकीकरणावर आणि वाहनांवर बंधने आणली तरी आवश्यक निर्मितीसाठी आणि वाहनांसाठी उर्जा लागणारच, त्यासाठी परिवर्तनीय व कार्बन उत्सर्जन विरहित उर्जानिर्मिती करावी लागेल.

शाश्वत व समृद्ध पर्यावरण आर्थिक समृद्धी मिळवून देते. पर्यावरणीय दारिद्र्यामुळे आर्थिक दारिद्र्य येते. निसर्गाचे अदृश्य अर्थशास्त्र समजले की, निसर्गातील समृद्धीची जाणीव होते. पर्यावरणीय प्रकल्प यशस्वी होण्यासाठी विकेंद्रीत आर्थिक धोरण राबवावे लागेल. जनजागृती करावी लागेल. निसर्ग व पर्यावरणाच्या बाबतीत फारच गंभीर व दृढ असले पाहिजे. खंबीरपणे पर्यावरणीय महासंकटाला आवरण्यासाठी कडक कायदे केले पाहिजेत. आणि त्याची सातत्याने अंमलबजावणी झाली पाहिजे. आपल्याला त्या उज्ज्वल संस्कृतीचा पुन्हा पुरस्कार व अंगीकार करावा लागेल तरच जीवसृष्टीच्या विनाशाचे सहावे पर्व आणखी एखादे शतक पुढे ढकलता येईल. मानव वेळीच जागा हो, आपली जीवनशैली निसर्गस्नेही कर. कृतज्ञतेने निसर्गमातेची प्रेमाने सेवा कर. Be the change you want to see - महात्मा गांधी. जेथे इच्छा तेथे मार्ग नक्कीच सापडतो अवघड प्रसंगावरही मात करणे हे बुद्धीमान मानवालाच शक्य आहे. पण प्रयत्नांची पराकाष्टा केलीच पाहिजे.

**संदर्भ ग्रंथ –**

१. बायोमिमिक्री – जेनिन बेन्सुस १९९७
२. डॉ अनिल गांधी – युद्ध कोरोनाशी वाचवू या जीवसृष्टी, प्रकाशक – सुनील अनिल मेहता, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९४१, सदाशिव पेठ, गाडीवाले कॉलनी, पुणे– ३०.
३. दैनिक वृत्तपत्र : पुण्यनगरी– ५ जून २०२०